**दिनांक** 23/09/2025

# प्रेसनोट

## अवैध व्यवसाय विरोधी अभियान - 05

### सप्टेंबरच्या तिस-या आठवडयात सुमारे 438 कारवाया, 50 लाखाहून अधिक रक्कमेचा मुददेमाल जप्त

परिक्षेत्रात सुरु असलेल्या अवैध दारु, मटका, जुगार, ऑनलाईन लॉटरी, क्रिकेट बेटिंग, गुटखा, अंमली पदार्थ, वेश्याव्यवसाय, वाळु उपसा व वाहतुक अवैध प्रवासी वाहतूक इत्यादींना आळा घालण्यासाठी, पोलीस उपमहानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी दिनांक 1 मे पासुन नांदेड परिक्षेत्रात अवैध व्यवसाय विरोधी अभियान सुरु केले आहे.

पोलीसांनी, नांदेड परिक्षेत्रात मे, जुन, जुलै व ऑगस्ट महिन्यात राबविलेल्या अवैध व्यवसाय विरोधी अभियान - 1, अभियान - 2, अभियान - 3 व अभियान - 4 दरम्यान, अवैध व्यवसायांत गुंतलेल्या 7696 इसमांचे विरुध्द एकूण 6784 केसेस करुन 33,44,56,249/- रुपयांचा मुद्येमाल हस्तगत केला होता.

सदर कारवाईनंतर दिनांक 1 सप्टेंबर पासून परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांचा पुर्णपणे बिमोड करण्यासाठी **अवैध व्यवसाय विरोधी अभियान** - 5 राबविण्यात येत असून सदर मोहिम अधिक व्यापक करुन, सप्टेंबरच्या तिस-या आठवडयात, **दिनांक** 15/09/2025 **ते दिनांक** 21/09/2025 पावेतो नांदेड परिक्षेत्रातील चारही जिल्हयांनी खालीलप्रमाणे कामगिरी केली आहे.

| **अ.क्र.** | **जिल्हा** | **एकूण केसेस** | **आरोपी संख्या** | **जप्त मुद्येमाल किंमत** |
|---|---|---|---|---|
| 1. | नांदेड | 118 | **138** | **7,45,570** |
| 2. | परभणी | 88 | 113 | 38,20,875 |
| 3. | लातूर | 136 | 139 | 6,19,735 |
| 4. | हिंगोली | 96 | 105 | 1,94,845 |
| | **एकूण** | **438** | **495** | **53,81,025** |

उपरोक्त कारवाई दरम्यान, परभणी जिल्हयातील पोस्टे जिंतुर यांनी अवैधरित्या चालणा-या जुगारावर कारवाई करुन 19 इसमांना पकडुन एकूण 36,40,660/- रुपयांचा मुददेमाल जप्त करून चांगली कामगिरी केली आहे. सदर कामगिरी बाबत, पोलीस उप महानिरीक्षक यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, नागरिकांनी नजीकच्या पोलीस ठाण्यास अथवा पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाच्या **nandedrange.mahapolice.gov.in** या संकेतस्थळावर किंवा **91 50 100 100** या '**खबर** ' हेल्पलाईनवर कळवून अशा अवैध व्यवसायांचा बिमोड करण्यासाठी आपला हातभार लावावा, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी केले आहे.

कार्यालय पोलीस उप महानिरीक्षक,
नांदेड परिक्षेत्र, नांदेड